जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक ०९.०८.२०२५**

'' वेश्या व्यवसाय करवुन घेणाऱ्या आरोपीस गुन्हे शाखेकडुन अटक ''

दिनांक ०८/०८/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती वैशाली गोरडे यांना माहिती मिळाली की, सुर्या लॉज, श्रीराम पेट्रोलपंप चौक, आशेळे रोड, उल्हासनगर कॅम्प नं.४ या ठिकाणी लॉज चालक ०२ असहाय्य मुलींना फुस लावुन वेश्यागमनासाठी बोलवणार आहे. सदर मिळालेल्या माहिती वरून अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पोलीस पथकाने सापळा लावून लॉज चालकास ताब्यात घेवुन त्याच्या रखवालीत असलेल्या ०२ पिडीत मुलींची सुटका केली आहे.

सदर प्रकाराबाबत आरोपीविरुध्द विठठ्लवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि.नंबर । ०५६३/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १४३(१), १४३(३) सह अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम सन १९५६ चे कलम ३, ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपीस अटक करण्यात आली आहे.

सदर कारवाई ही श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे तसेच श्री.विनय घोरपडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, (प्रतिबंध) यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक/श्रीमती.वैशाली गोरडे, पोहवा/ व्ही.आर.पाटील, आर.यु. सुवारे, व्ही.जी.नाईक, के.बी.पाटील, मपोअमं/पी.जी.खरात, एच.आर.थोरात, के.एम.चांदेकर, चापोशि/ एस.सी.पाटील यांनी यशस्वीपणे पार पाडलेली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर